अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि.१८ जुलै २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : २८९ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२

## पाण्याच्या हौदातून जार काढताना विजेचा धक्का बसून मुलाचा मृत्यू

**उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची येथे गुरुवारी सकाळी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. घरातील पाण्याच्या हौदात पडलेला जार काढण्याच्या प्रयत्नात विजेचा तीव्र धक्का लागल्याने आदित्य सिताराम मोहिते (वय १६) या मुलाचा मृत्यू झाला. आदित्य हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा असल्याने या घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

आदित्य गुरुवारी सकाळी नेहमीप्रमाणे व्यायाम करून घरी परतला होता. यावेळी घरातील पाण्याच्या हौदात एक जार पडलेला त्याला दिसला. तो काढण्यासाठी हौदावर चढला असता, त्याचा हात पत्र्याच्या अँगलला लागला आणि त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. घरातल्यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने घरातील मुख्य वीजपुरवठा बंद केला.

मात्र तोपर्यंत आदित्य हौदात कोसळला होता. कुटुंबियांनी आणि शेजाऱ्यांनी त्याला तातडीने हौदातून बाहेर काढून सोलापूरच्या यशोधरा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. आदित्य हा मोहिते कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता.

**वादाचा भडका**

# आव्हाड-पडळकर कट्टर समर्थकांमध्ये ‘फाईट टू फाईट’ चक्क विभानभवनात धक्काबुक्कीसह ‘फ्री स्टाईल’ हाणामारी!

**मुंबई/खास प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील वाद काही थांबायला तयार नाही. आज गुरुवारी (ता.१७) विधानभवनात ‘ओपन चॅलेंज’ देत आव्हाड आणि पडळकर समर्थकांनी एकमेकांसमोर भिडत ‘फाईट टू फाईट’ मोठा राडा घातला. दोघांच्याही कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करतानाच तुफान हाणामारीदेखील केली. विधानभवनाच्या पायऱ्यांजवळ हे समर्थक भिडले. सर्वात धक्कादायक म्हणजे विधानभवनाच्या आवारात ‘फ्री स्टाईल’ हाणामारीचा हा सारा प्रकार घडला आहे.**

एकदिवसापूर्वी काल बुधवारी (ता.१६) गोपीचंद पडळकर आणि आव्हाड यांच्यात जोरदार वाद झाला होता. हे प्रकरण शिवीगाळपर्यंत गेलं होतं. त्यानंतर आता विधानभवनात या दोघांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. दोघांच्याही कार्यकर्तामध्ये तुफान हाणामारी झाली, एकमेकांना शिवीगाळही करण्यात आली.

सध्या मुंबईत पावसाळी अधिवेशन सुरु आहे. यादरम्यान गुरुवारी (१७ जुलै) दुपारच्या सुमारास गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते विधानभवनाच्या पायऱ्यांजवळ होते. यावेळी त्यांच्यात धक्काबुक्की झाली, दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना शिवीगाळ करत मारहाण केली. प्रकरण वाढत असल्याचे लक्षात येताच, विधानभवन परिसरात उपस्थित असलेल्या सुरक्षारक्षकांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र कोणीच काही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. जवळपास पाच ते दहा मिनिटे प्रचंड वादावदी सुरु होती. यावेळी कार्यकर्त्यांनी एकमेकांना मारझोड करण्यासह शिवीगाळही केली.

### जितेंद्र आव्हाड म्हणाले, माझ्यावर जीवघेणा हल्ला करण्यासाठी आले होते गुंड

या प्रकरणानंतर जितेंद्र आव्हाड हे माध्यमांसमोर आले, त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारताच त्यांनी विचारलं की हल्ला कोणी केला? पत्रकार म्हणाले की पडळकर समर्थकांनी केला. त्यानंतर जितेंद्र आव्हाड भडकलेले दिसले. अख्ख्या महाराष्ट्राला दिसलं की हल्ला कोणी केला, आम्हाला यापेक्षा जास्त काही पुरावा द्यायचा नाही. जर तुम्ही विधानसभेत गुंडांना प्रवेश देणार असाल, ते आमच्यावर हल्ला करणार असतील तर आमचे लोक सुरक्षित नाहीयेत. मला शिवीगाळ केली, मारण्याची धमकी दिली, असं आव्हाड म्हणले. हे सगळे मलाच मारण्यासाठी आले होते, असंही ते म्हणाले. विधानभवनात आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार, काय गुन्हा आहे आमचा. सत्तेचा इतका मुजोरपणा, इतका माज, असं म्हणत आव्हाड चांगलेच संतापलेले पाहायला मिळाले.



मुंबई : विधान भवनाच्या आवारातच जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये गुरुवारी अशी फ्री स्टाईल हाणामारी झाली.

**अहवाल येताच कारवाई करणार : नार्वेकर :** विधिमंडळ परिसरात जी घटना घडलेली आहे, ती दुर्दैवी आहे. याप्रकरणी मी अहवाल मागवला असून आज अहवाल मला मिळेल आणि त्यानुसार मी फौजदारीची कारवाई करणार आहे, अशा स्पष्ट शब्दात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर माध्यमांशी बोलताना सांगितले. या हाणामारीच्या घटनेत ज्यांचा सहभाग होता, त्यांच्यावरती फौजदारी कारवाई करेन आणि माझ्या अधिकारात सुद्धा जे अधिकार आहेत, त्यानुसार कारवाई करणार आहे. विधिमंडळात असे हिंसक कृत्य होऊ देणार नाही, यासाठी कारवाई करावी लागेल अशा शब्दात विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

## विधानभवनाच्या आवारातच दोघा समर्थकांमध्ये तुंबळ राडा

### उद्धव ठाकरेंची नाराजी म्हणाले, गुंडगिरी विधीमंडळात घुसली

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही या विषयावर नाराजी व्यक्त केली. गुंडगिरी आता विधिमंडळात पोहोचली असल्याचा आरोप त्यांनी केला. या गुंडांना कुणी प्रवेशिका दिल्या? त्यांची नावे उघड केली पाहिजे. तसेच विधानसभेच्या अध्यक्षांनी हाणामारी करणाऱ्या गुंडांवर आणि त्यांच्या पोशिंद्यांवर कारवाई करावी. विधिमंडळ हे लोकशाहीचे मंदिर आहे. इथे जर अशाप्रकारे मारहाण होत असेल तर विधानभवनाचे महत्त्व उरले आहे का? असा प्रश्न निर्माण होतो, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली.

## जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकरांमधील टोकाचा संघर्ष थांबता थांबेना

### विधीमंडळात आमदार रोहित पवार आक्रमक म्हणाले, मारेकऱ्यांचा शोध घ्या

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार यांनी याबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना कुणी मारहाण केली, याचा शोध घ्यावा, अशी मागणी त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे केली. आमदार रोहित पवार आव्हाडांच्या प्रकरणात विधीमंडळाच्या सभागृहात प्रचंड आक्रमक झाल्याचे दिसून आले.

### हाणामारीच्या घटनेवर गोपीचंद पडळकरांनी व्यक्त केली दिलगिरी

विधीमंडळाच्या आवारात आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी झाली आहे. या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. विधानसभेच्या प्रांगणात जी घटना घडली आहे, ती अत्यंत दुर्दैवी आहे. त्याचे अतिव दुःख विधानसभेचा सदस्य म्हणून मला आहे. विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती यांच्याकडे याबाबत दिलगिरी व्यक्त करतो, अशा शब्दांत गोपीचंद पडळकर यांनी हाणामारीच्या घटनेवर दिलगिरी व्यक्त केली आहे.

### विधीमंडळाच्या आवारातील हाणामारीवर मुख्यमंत्र्यांचा संताप; विधानसभेला शोभणारा प्रकार नाही,दोषींवर कडक कारवाई झालीच पाहिजे

विधीमंडळाच्या आवारात घडलेली घटना अतिशय चुकीची आहे. अशी घटना घडणे, योग्य नाही. विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती यांनी गंभीर दखल घ्यावी आणि संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी विनंती मी केली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात लोक जमा होतात आणि मारामारी करतात, हे विधानसभेला शोभणारे नाही. म्हणून संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळाच्या आवारातील हाणामारीवर दिली.

## जातीच्या दाखल्यासंदर्भातील पुनर्विचार याचिकेप्रकरणी आमदार उत्तम जानकरांना हायकोर्टाने बजावली नोटीस

▶▶ संकल्प डोळस यांनी जातीच्या दाखल्यावर आक्षेप घेऊन केलेल्या दाखल याचिकेवर सुनावणी

▶▶ जानकर अन् डोळस हे दोघे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचेच, पण दोघांमध्ये हायकोर्टापर्यंत टोकाचा कायदेशीर संघर्ष

### संकल्प डोळस यांची याचिकेतून काय आहे नेमकी मागणी?

माळशिरस तालुक्याचे सध्याचे आमदार खोट्या जात प्रमाणपत्रावर निवडून आले आहेत. सर्वसामान्य मागासवर्गीय समाजामध्ये अतिक्रमण केले आहे. स्व. हनुमंतराव डोळस यांनी मागील पंधरा वर्षे लढा सुरू ठेवला होता, तोच लढा पुढे नेत असताना न्यायालयाने दिलेल्या लिबर्टीचा वापर करत मागील दहा दिवसांत पुनर्याचिका दाखल केली होती. त्याची सुनावणी झाली. यामध्ये आमचा मोठा विजय झाला. उत्तम जानकर यांना नोटीस बचवण्यात आली आहे. येणाऱ्या ३० तारखेला सुनावणी ठेवण्यात आली आहे आणि काही पण करून शहानिशा झालीच पाहिजे. आम्हाला न्याय मिळेल हीच अपेक्षा आहे.



**मुंबई-सोलापूर** : माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार उत्तम जानकर यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून नोटीस देण्यात आलेली आहे. स्व. हनुमंतराव डोळस यांचे पुत्र संकल्प डोळस यांनी जातीचा खोट्या दाखल्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या लिबर्टीचा वापर करून न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली असल्याने जानकरांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. आमदार उत्तम जानकर यांच्याशी संपर्क साधून त्यांची बाजू ऐकण्याचा प्रयत्न केला. मात्र संपर्क होऊ शकला नाही. दरम्यान याप्रकरणी येत्या ३० जुलै रोजी पुन्हा मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी होणार असून जानकर हे काय बाजू मांडणार? याचे औत्सुक्य राहणार आहे.

(उर्वरित बातमी पान १२ वर)

## लग्नाच्या आमिषातून अल्पवयीन मुलीसोबत ठेवले शारीरिक संबंध; पिडिता राहिली गरोदर, कारवाईसाठी आईची पोलिस ठाण्यात धाव

**सोलापूर** : ओळखीचा गैरफायदा घेत अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवले. त्यातून ती गरोदर राहिली. आपल्या बिगर लग्नाच्या मुलीबद्दलचा हा प्रकार ऐकून जन्मदात्या आईच्या पायाखालची जमिनीच सरकली. पुढच्या क्षणी तिने स्वत:ला सावरत एमआयडीसी पोलिस ठाणे गाठले. ज्या तरुणाने फसवणुकीतून हा प्रकार केला त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन न्याय देण्याची मागणी एमआयडीसी पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांकडे केली.

दरम्यान मंगळवारी (ता.१७) रात्री उशिरा याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध बीएनएस कलम ६४, ६४ (२) (१) ६४ (२) (एम), ६९ सह पोक्सो कलम ४, ८, १२.अन्वये गुन्हा नोंदला आहे. अब्जान इरफान बागवान (वय १९) असे गुन्हा नोंदलेल्या तरुणाचे नाव आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, यातील पीडिता आईसमवेत पूर्व भागातील एका पेठेत राहते. पीडितेची आई कामावर गेलेली असताना नमूद आरोपी (एप्रिल २०२५) च्या दुसऱ्या आठवड्यात घरामध्ये शिरला आणि त्याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी वारंवार अत्याचार केला. यातून ती गरोदर राहिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.


याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलिस आयुक्त, वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, दुय्यम पोलिस निरीक्षक केंद्रे यांनी रात्री उशिरा पीडितेची भेट घेऊन अधिक माहिती जाणून घेतली आहे. या घटनेचा अधिक तपास महिला पोलिस निरीक्षक केंद्रे करीत आहेत.

### अत्याचार करुन उलट पिडितेलाच दमदाटी, एमआयडीसी पोलिसांत तरुणाविरुद्ध पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल

दुसऱ्या एका घटनेत लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला आणि विचारणा केली असता शिवीगाळ व दमदाटी करून ‘तुझ्याशी लग्न करणार नाही,’ अशी फिर्याद पीडितेने एमआयडीसी पोलिस ठाण्यात १६ जुलैच्या रात्री १२:३७ च्या सुमारास केली आहे. हा प्रकार (दि.१२ मे ते १४ जुलै) दरम्यान घडल्याची फिर्याद पीडितेच्या आईने दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपी तौफिक मेहबूब सय्यद (वय २४) विरुद्ध बीएनएस कलम ६४, ६४(२) (१)६४(२) (एम), ६९ सह पोक्सो कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा नोंदलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. अधिक तपास फौजदार वाघमारे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



यांनाच लोकांनी निवडून दिलं होतं का?

संगम श्री डे 570-23-148

संगम श्री नाईट 226-07-133

कल्याण 359-72-138

मुंबई 790-69-289

## मायबाप राज्य सरकारचे ‘अरण’ला मोठे ‘गिफ्ट’

## तीर्थक्षेत्राला ‘अ’ दर्जा, १५० कोटींच्या विकास आराखड्याला मंजुरी

**सोलापूर : माढा तालुक्यातील श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर तीर्थक्षेत्रास मायबाप सरकारने मोठे गिफ्ट दिले असून या तीर्थक्षेत्राला ‘अ’ वर्गाचा दर्जा दिला आहे. शिवाय येथील तब्बल १५० कोटींच्या विकास आराखड्याला गुरुवारी (ता.१७) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.**

- **श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर परिसराचा सर्वांगीण होणार विकास**
- **चांगल्या मुलभूत सुविधांच्या तीर्थक्षेत्रांच्या यादीवर येणार अरणचे सावता महाराज मंदिर**
- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिलेला शब्द पाळला**
- **पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या पाठपुराव्याला यश**



विशेषत्वे, या निर्णयामुळे श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास होणार आहे. चांगल्या मुलभूत सुविधांच्या तीर्थक्षेत्रांच्या यादीवर अरणचे सावता महाराज मंदिर येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अरण तीर्थक्षेत्र विकासासंबंधी दिलेला शब्द पाळला असून सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या पाठपुराव्याला यश आले आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सावता महाराजांच्या भाविक भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण पसरणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर अरण तालुका माढा क्षेत्रात ‘अ’ वर्ग दर्जा घेऊन विकसित करण्याची यापूर्वी घोषणा केली होती. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत श्रीक्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर अरण, ता. माढा या तीर्थक्षेत्रास ‘अ’ वर्ग दर्जा देण्यात आला असून तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवनी समाधी मंदिर अरण (ता. माढा, जि. सोलापूर) तीर्थक्षेत्र विकास आराखडा या नवीन योजनेस मान्यता देण्याचा प्रस्ताव दि. १७ जुलै रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये दीडशे कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता दिली आहे.

हा विकास आराखडा तयार करण्यासाठी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष पाठपुरावा व प्रयत्न केले आहेत. तीर्थक्षेत्र अरण येथे दीडशे कोटींच्या विकास आराखड्यास राज्य शासनाने मान्यता दिल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष आभार मानले आहे.

या आराखड्यामुळे तीर्थक्षेत्र अरण गावाचा मोठा कायापालट होणार असून महाराष्ट्रातील पहिल्या फळीच्या तीर्थक्षेत्रामध्ये नक्कीच अरणचा समावेश झाल्याचे पहावयास मिळणार आहे. भाविक भक्तांची मांदियाळीही मोठ्या प्रमाणात श्री संत शिरोमणी सावता महाराजांच्या अरणमध्ये वाढणार असल्याचे दिसणार आहे.

### १५० कोटींच्या निधीतून अरणमध्ये ‘हे’ साकारलं जाणार

या मंजूर आराखड्यामध्ये सभा मंडप भक्त निवास व अन्नछत्र, संत सृष्टी म्युझियम, दर्शन मंडप, स्वच्छतागृह, छत असलेली मार्गिका, देवस्थान प्रशासकीय कार्यालय, बस स्टॉप, मुख्य मंदिर जीर्णोद्धार व सुशोभीकरण, श्री विठ्ठल आणि श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचा ब्रॉन्झ पुतळा, स्कायवॉक, पाण्याची टाकी, जुनी विहीर जीर्णोद्धार व सुशोभीकरण, म्युझियम मीडिया रंगकाम व भिंती चित्रे, कमान व वाहन तळ, पालखी तळ सुधारणा, भूमी रचना व सौंदर्यकरण, पोचमार्ग सुधारणा, पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईन, जलपुनर्भरण, कचरा संकलन प्रणाली, दिशादर्शक कार्यालय, साइन बोर्ड, विद्युतीकरण वातानुकुलित यंत्रणा, सीसीटीव्ही यंत्रणा इत्यादी विकास कामांचा समावेश होणार असून याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.